१८६४
१३/०४/२२

**महाराष्ट्र शासन**

अल्पसंख्याक विकास विभाग,

रुम नं.७१४, ७ वा मजला (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
(दूरध्वनी क्र.०२२-२२८३२२३७ )
(ई-मेल : desk4.mdd-mh@gov.in)

---

क्रमांक: वक्फ २०२२ /प्र.क्र.६०/का-४

दिनांक : ३१.०३ .२०२२.

१९७
२०/०४/२२
२१

प्रति,

अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव,
सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय: महाराष्ट्र राज्य वक्फ-मंडळावर "सह सचिव पेक्षा कमी नाही अशा दर्जाचा शासनाचा अधिकारी" या संवर्गातून "सदस्य" म्हणून नियुक्ती करण्यासाठी अधिकाऱ्याचे नाव उपलब्ध करुन देणेबाबत......

भारत सरकारने वक्फ अधिनियम, १९९५ हा कायदा पारीत करुन संपूर्ण देशात लागू केला. सदर कायदा महाराष्ट्र राज्यात दि.०१/०१/१९९६ पासून लागू करण्यात आलेला असून या कायद्यातील तरतुदींनुसार शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.वक्फ-१०/ २००१/ प्र.क्र.१५४/ ल-३, दि.४ जानेवारी, २००२ अन्वये पनचक्की, औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. स्थानिक वक्फ मालमत्तेचे संरक्षण करणे, विकास करणे तसेच हजारो वक्फ संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे तंटे सोडविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, इ. कामे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रशासकीय व्यवस्थापनेकडे सोपविण्यात आलेली आहेत.

वक्फ अधिनियम,१९९५ च्या वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम १४ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सदस्य नियुक्ती करण्याकरिता तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत. वक्फ अधिनियम १९९५ मधील विविध संवर्गातून कमाल १२ सदस्यांची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर नियुक्ती करता येते.

वक्फ अधिनियम १९९५ कलम १४(१)(इ) मधील तरतुदीनुसार "सह सचिव पेक्षा कमी नाही अशा दर्जाचा शासनाचा अधिकारी" या संवर्गातून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सहसचिव दर्जाच्या मुस्लिम अधिकाऱ्याची "सदस्य" म्हणून नियुक्ती करता येते.

सदर संवर्गातून दि.१८.०५.२०१७ च्या शासन अधिसूचनेन्वये नियुक्त करण्यात आलेल्या सदस्याचा कार्यकाळ दि.१७.०५.२०२२ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे वक्फ अधिनियम १९९५ कलम १४(१)(इ) मधील तरतुदीनुसार "सह सचिव पेक्षा कमी नाही अशा दर्जाचा शासनाचा अधिकारी" या संवर्गातून वक्फ मंडळावर सदस्याची नियुक्ती करावयाची आहे.

तरी, "सह सचिव पेक्षा कमी नाही अशा दर्जाचा शासनाचा अधिकारी" या संवर्गातून वक्फ मंडळावर सदस्य म्हणून नियुक्त होण्यास इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील तसेच अधिपत्याखालील शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या सह सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेल्या सुयोग्य मुस्लिम अधिकाऱ्याचे नाव त्यांचा अर्ज, किमान ३ वर्षाचे गोपनीय अहवाल, सेवा तपशील व त्यांच्या विरुध्द विभागीय/न्यायालयीन चौकशी प्रस्तावित/ प्रलंबित आहे किंवा कसे तसेच त्यांची सचोटी याबाबतची सविस्तर माहिती या विभागास त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती.

(दि.मा.सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

कार्यासन - ४ संग्रहार्थ.